# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

श्रावण मास

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २२५ । सोमवार, दि.११ ऑगस्ट २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### अंमलबजावणीत यंत्रणा नेहमीच अनुत्तीर्ण

शाळकरी मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक जटिल होत आहे. उघडकीस येणार्‍या घटनांमुळे पालकांचे मनोधैर्य खच्ची होत आहे. मुलींना शाळेत पाठवावे की नाही, असा प्रश्न अनेकांना पडत नसेल तरच नवल. नुकत्याच अशा दोन घटना उघडकीस आल्या. विद्यार्थ्यांची वाहतूक करणार्‍या शालेय बसच्या चालकाने एका मुलीचा विनयभंग केला. विद्यार्थ्यांची ने-आण करणार्‍या एका रिक्षाचालकाने एका मुलीला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. या दोन्ही घटना माध्यमांत प्रसिद्ध झाल्यावर प्रतिक्रिया उमटल्या. सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष करणार्‍या शाळांविरोधात गुन्हे दाखल करणार असल्याचे छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस आयुक्तांनी जाहीर केले. पण सुरक्षा नियमांची आठवण प्रशासनाला नेहमी घटना घडल्यावरच का येते? शिक्षण विभागाने शाळा सुरू होण्यापूर्वी ढीगभर मार्गदर्शक सूचनांचा अध्यादेश काढण्याचा उपचार पूर्ण केला. सूचनांची यादी भली मोठी आहे. जणू प्रशासनाला विद्यार्थ्यांच्या, विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेची किती काळजी आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न म्हटला जाऊ शकेल. पण त्यानंतरही अशा घटना घडायच्या थांबल्या नाहीत. त्या सूचनांच्या यादीत सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवणे अनिवार्य, कर्मचार्‍यांची कसून तपासणी, आवश्यकता भासल्यास त्यांच्याकडून चारित्र्य प्रमाणपत्र घेणे, शाळांच्या बस असल्यास प्रत्येक बसमध्ये महिला कर्मचारी अशा अनेक गोष्टी शाळा व्यवस्थापनांना बंधनकारक करण्यात आल्या आहेत. सूचना चांगल्याच आहेत पण अंमलबजावणीअभावी त्या निरर्थक ठरतात. सीसीटीव्हीचा डेटा महिनाभर सुरक्षित ठेवावा, अशी एक सूचना त्यात आहे. पण त्यासाठी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवले जायला हवेत ना? तसे ते बसवले जात नाहीत याविषयीचे वृत्त माध्यमांत अधूनमधून प्रसिद्ध होते असते. किती वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसवले गेले? किती शाळांमध्ये तशी व्यवस्था केली गेली? त्यासाठी निधी उपलब्ध करवून देण्याची जबाबदारी कोणाची? महिला कर्मचारी खरेच नेमल्या पान २ वर »

# दुष्काळाचे सावट!

## राज्यभरात खरिपाची पिके धोक्यात

**पुणे ।** राज्यात काही ठिकाणी पाऊस सक्रिय झाला असला, तरी जुलै महिना पूर्ण कोरडा गेल्याने त्याचा परिणाम खरिपातील पिकांवर झाला आहे. अनेक ठिकाणी पुरेसा पाऊस नसल्याने पिके अखेरची घटका मोजत आहेत. राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २२५ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला असून, १३० तालुक्यांत १०० टक्क्यांहून अधिक पाऊस झाल्याची नोंद आहे.

यंदा १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. राज्यात मे महिन्याच्या अखेरीस नैऋत्य मोसमी वारे दाखल होऊन पावसाला सुरुवात झाली. दहा दिवस आधीच मान्सून दाखल झाल्याने मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनमध्ये राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भातील अनेक धरणे भरल्याने मोठ्या प्रमाणात विसर्गही झाला. उत्तर महाराष्ट्रात मात्र पेरणीनंतर पुरेसा पाऊस नसल्याने खरीपाच्या पिकांना फटका बसला आहे.मध्य महाराष्ट्राचा पूर्व भाग, खान्देश, मराठवाडा व विदर्भात पुरेसा पाऊस न झाल्याने त्याचा परिणाम पेरण्यांवर झाला आहे. पाऊस नसल्याने ही पिके जळण्याच्या स्थितीत आहेत. राज्यातील काही तालुक्यांत कमी पाऊस असल्याने पिके अडचणीत आली आहेत. शेतकर्‍यांनी सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास पिके तग धरून राहतील, असे कृषी विभागाने सांगितले असले तरी सर्वच शेतकर्‍यांकडे सिंचनाची व्यवस्था नाही.





### राज्यात ९५ टक्के पेरण्या

राज्यात सरासरीच्या १४४ लाख ३६ हजार हेक्टरपैकी १३७लाख ३४ हजार हेक्टर म्हणजेच ९५ टक्के पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षी याच काळात १४५ लाख ८२ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. राज्यात दोन महिन्यांत सरासरीच्या ५३८.५ मिलिमीटरपैकी ४९७.८ मिलिमीटर म्हणजेच ९२ टक्के पाऊस झाला आहे. १२ जिल्ह्यांत १०० टक्क्यांहून अधिक पाऊस पडला आहे. २२ जिल्ह्यांत १०० टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. मध्य महाराष्ट्राचा पूर्व भाग, मराठवाडा, खान्देश, पश्चिम विदर्भात कमी पाऊस पडला आहे.

## भारताचे सामर्थ्य जगाने ओळखले

### पंतप्रधान मोदींचा अमेरिकेला टोला

**बंगळुरु ।** ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला गुडघ्यावर आणण्याचे काम तंत्रज्ञानाच्या मदतीनेच झाले. आज ऑपरेशन सिंदूरनंतर मी पहिल्यांदा बंगळुरुमध्ये आलो आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय लष्कराने, सैन्य दलांनी सीमेच्या पलिकडे जाऊन दहशतवाद्यांचे तळ नेस्तनाबूत केले. तसेच पाकिस्तानला गुडघ्यावर आणण्याची आपली ताकद सगळ्या जगाने पाहिली आहे. ऑपरेशन सिंदूर यशस्वी झाले कारण यामागे सर्वात मोठी गोष्ट होती ती म्हणजे आपले तंत्रज्ञान आणि टेक्निकली उत्तर देण्याची आपली क्षमता. मी या दोन गोष्टींसाठी बंगळुरुतल्या सगळ्यांचे अभिनंदन करतो असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



बंगळुरुची ओळख जागतिक पातळीवर एक महत्त्वाचं शहर म्हणून घेतली जाते आहे. आज घडीला मॉडर्न इन्फ्रासाठी प्रकल्प पूर्ण करण्यावर आमचा भर आहे. आज यलो लाइन मेट्रो सेवा सुरु झाली आहे. त्यामुळे शहरातले छोटे भाग जोडण्यात मदत होणार आहे. आज यलो लाइन सुरु झाली आहे तिसऱ्या मार्गाचं भूमिपूजन झाले आहे. तिसरी मार्गिका सुरु झाली की बंगळुरुच्या वाहतुकीला नवे बळ मिळेल, नवी उर्जा मिळेल असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलंय.

२०१४ मध्ये फक्त पाच शहरांमध्ये मेट्रो धावत होती. आज ११ वर्षांनी देशातल्या २४ शहरांमध्ये मेट्रोचे जाळं उभारण्यात आलं आणि ते विस्तारण्यात आले आहे. भारत आता जगातला मेट्रोचं जाळं असलेला तिसरा देश झाला आहे. २०१४ पर्यंत भारतात फक्त ७४ विमानतळ होती. आता ही संख्या १६० च्याही पुढे गेली आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले आहे.

## आम्ही सर्वांचे बॉस आहोत-राजनाथ सिंग

**रायसेन ।** डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के कर लादला आहे. त्यामुळे भारत आणि अमेरिकेतील संबंध बिघडले आहेत. अशातच आता संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ट्रम्प यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. राजनाथ सिंग यांनी काही लोक भारताच्या विकासावर नाराज आहेत. त्यांना भारताचा विकास होत आहे हे आवडत नाही असे विधान केले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग हे मध्य प्रदेशातील रायसेन येथे रेल्वे कोच फॅक्टरीची पायाभरणी करण्यासाठी आले होते. यावेळी बोलताना सिंग यांनी म्हटले की,



जगात काही लोक असे आहेत ज्यांना भारताची जलद प्रगती आवडत नाही. त्यांना ते आवडत नाही. मात्र आम्ही सर्वांचे बॉस आहोत. ते विचार करत आहेत की भारत इतक्या वेगाने कसा प्रगती करत आहे? बरेच लोक भारतीयांच्या वस्तू इतर देशांमध्ये बनवलेल्या वस्तूंपेक्षा महाग करण्याचा प्रयत्न करत आहेत. याद्वारे भारतीय वस्तूंची मागणी कमी करण्याचा प्रयत्न आहे. मात्र भारत वेगाने प्रगती करत आहे. मी पूर्ण आत्मविश्वासाने सांगतो की आता जगातील कोणतीही शक्ती भारताला जगातील मोठी शक्ती बनण्यापासून रोखू शकत नाही. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, पूर्वी संरक्षण क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या वस्तू परदेशात बनवल्या जात होत्या जेव्हा जेव्हा आम्हाला त्यांची गरज पडायची तेव्हा आम्ही खरेदी करायचो. यात विमाने आणि शस्त्रांचा समावेश होता. मात्र आता यापैकी बहुतेक गोष्टी केवळ भारतातच नाही तर भारत स्वतः बनवत आहे. तसेच त्या वस्तू आता इतर देशांमध्ये देखील निर्यात केल्या जात आहेत. या क्षेत्रात भारत प्रगती करत आहेत.

## जैन मुनी संतापले

**मुंबई ।** उच्च न्यायालयाने कबुतरखान्याच्या आसपास कबुतरांना खाद्य टाकण्यावर घातलेली बंदी कायम ठेवल्यानंतर जैन समाज अधिक आक्रमक झाला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही जैन समाजातील काही व्यक्तींनी दादर कबुतरखान्याजवळ कबुतरांना अन्न टाकले होते. मात्र पोलिसांनी तातडीने कारवाई करून त्यांना थांबवले. यामुळे समाजाने १३ तारखेपासून कबुतरखाना बंद करण्याच्या निर्णयाविरोधात उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे. जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी देखील यावर प्रतिक्रिया देत 'गरज पडल्यास हातात शस्त्र घेऊ' असे म्हटले आहे.

## गडकरींचे मतदार वगळले; अजून काय पुरावा हवा?

**नागपूर ।** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एका दीर्घ पत्रकार परिषदेत भाजप व निवडणूक आयोगावर मतचोरीचा थेट आरोप केला. राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर अनेक गंभीर आरोप करत बोगस मतदारांबाबत मोठा दावा केला. राहुल गांधी यांनी कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील मतदार यादी दाखवून एकाच व्यक्तीचे नाव वेगवेगळ्या राज्यांमध्ये आणि मतदान केंद्रांवर नोंदवलेले असल्याचा दावा केला. यावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप होत असून, केंद्रीय



### काँग्रेसचा सवाल

मंत्री नितीन गडकरी यांचे नाव घेऊन काँग्रेसने भाजपा नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट सवाल केला आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेबांची कोणती चीप आणि डिस्क खराब झाली आहे? निवडणुक आयोगाची वकिली करणारे मुख्यमंत्री, भाजपा नेते गडकरींना जाब विचारणार का? मतचोरी होते, मतदारयादीत घोळ केले जातात याचा पुरावा आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला.

केंद्रीय मंत्री गडकरी यांनी गंभीर आरोप केला की त्यांच्या निवडणुकीत मतदारसंघातील ३,५०,००० नावे वगळण्यात आली. विशेष म्हणजे जी नावे वगळण्यात आली ते त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक होते. त्यांच्या भाच्याचे नावही वगळण्यात आले, असे गडकरी म्हणाले, असे सांगत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली.

### सीमेवर कर्तव्य बजावत असताना विजेचा धक्का बसल्याने

## गुढे येथील सीमा सुरक्षा दलाचा जवान शहीद

**गुढे, ता.भडगाव ।** येथील रहिवासी व भारतीय सीमा सुरक्षा सैन्य दलातील ५७ बटालियनचे जी.डी.कॉन्सटेब पदावर कार्यरत असलेले जवान स्वप्नील सुभाष सोनवणे (पाटील) (वय ३९) हे भारत - बांगलादेश सीमेजवळ पश्चिम बंगाल येथे दि.९ रोजी देशसेवा बजावत असताना शहीद झाले त्यांच्या या आकस्मित दुदैवी निधनाच्या घटनेने सोनवणे पाटील परिवारावर मोठा आघात झाला असून राखी बंधनाच्या दिवशीच ही घटना घडल्याने मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांचे पार्थिवदेह दि.१२ रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत गुढे या मूळ गावी येण्याची शक्यता आहे. ते येथील सेवानिवृत्त सूतगिरणी कर्मचारी स्व.सुभाष बळीराम सोनवणे यांचे ते एकुलते एक चिरंजीव होते हे सन २०१४ मध्ये हे ११ वर्षापूर्वी भारतीय सैन्य सीमा सुरक्षा दलात बीएसएफ भरती झाले होते ते आता पश्चिम बंगाल येथील ५७ बटालियन जी.डी.कॉन्सटेबल पदावर कार्यरत होते ते सेवा बजावत असताना दि.९ रोजी बहिण भावाचे पवित्र सणाच्या दिवशी देशसेवा बजावत असताना रात्री ८:३० वाजता त्यांना वीर मरण येऊन ते देशासाठी शहिद झाले. त्यांच्या पश्चात पत्नी कविता दोन लहानगे एक मुलगा रूद्राश वय ३ एक मुलगी योगेश्वरी ५ विधवा आई कल्पना विवाहित बहिण असा छोटा परिवार असून त्यांचा परिवार सध्या शिक्षणासाठी चाळीसगाव येथे कुंटुबासह वास्तव्याला आहेत बीएसएफच्या हॉस्पीटल येथे आज शवविच्छेदन करून त्यांचे पार्थिव शरीर आज बीएसएफ ५७ बटालियन सैनिक हे विशेष विमानाने गुढे मुळगावी दि.१२ रोजी सकाळी ८ वाजता येण्याची शक्यता आहे. ते सैन्य दलातून सेवानिवृत्त झाले.



## पोलीस तपासानंतर खरे-खोटे समोर येईल!

### प्रांजल खेवलकर प्रकरणावर ना.गिरीश महाजन प्रथमच बोलले

**जळगाव ।** रुपालीताई चाकणकरांनी ज्या पद्धतीने पोलिसांना माहिती मागितली त्या पद्धतीने पोलिसांनी त्यांना ती माहिती दिली आणि त्यांनी ती जशीच्या तशी वाचून दाखवली आहे. मला वाटते याबाबतीमध्ये आपण आता न बोललेलं बरं, पोलीस योग्य दिशेने तपास करत आहेत. तपासांती खरं काय खोटं काय? ते समोर येईल. आताच आपण सर्टिफिकेट देणे योग्य नाही. जे मी ऐकलं, रुपाली चाकणकर यांनी जे सांगितलं, त्यावरून हा खूप मोठा विषय आहे. देशामधला सगळ्यात मोठा विषय होऊ शकेल, असे गिरीश महाजन यांनी म्हटले आहे. भाजपकडून एकनाथराव खडसे यांच्याविरोधार आंदोलन करण्यात आले होते, खडसे कुटुंबावर आरोप सुरू आहेत, यावरून केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यावर देखील महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे, असे यावेळी महाजन यांनी म्हटले. पुणे पोलिसांनी काही दिवसांपूर्वी एका रेव्ह पार्टीवर छापा टाकला होता, या प्रकरणात एकनाथराव खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे, सध्या ते जेलमध्ये आहेत. दरम्यान या प्रकरणावर बोलताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले होते. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, रेव्ह पार्टीचा तपास पोलीस करत आहेत, आपण त्यात न बोललेलं बरं, याबाबतीत मला काही बोलायचं नाही, कुठलंही भाष्य करायचं नाही. कॅसेटमध्ये असेल किंवा मोबाईलमध्ये असेल काय असेल पोलिसांच्या तपासात बाहेर येईल, त्यामुळे आता यावर आपण न बोललेलं बरं.



## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2000 |
| नवती (२) | : 1800 |

### मिश्किली




## धनखड गायब? राऊतांचा आरोप

**मुंबई ।** देशाला अजूनही उपराष्ट्रपती नसल्यामुळे आजही आम्ही जगदीप धनखड यांनाच उपराष्ट्रपती मानतो. जगदीप धनखड हे २१ जुलैपासून बेपत्ता आहेत. देशाची उपराष्ट्रपती असलेली व्यक्ती, राज्यसभेचे चेअरमन २१ जुलै रोजी सकाळी राज्यसभेत आमच्यासमोर आले. त्यांची आमची चर्चा झाली. त्यांनी काही आदेश दिले, त्यानंतर सभागृह स्थगित झाले. त्यांची प्रकृती उत्तम होती, खणखणीत होती. ते काही काळ चिडले असतील, हास्यविनोद केले असतील, त्यांनी संवाद साधला आणि संध्याकाळी सहानंतर बातमी आली की, जगदीप धनखड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. हे आमच्यासाठी अत्यंत धक्कादायक आहे, इथपर्यंत आम्ही सहन करू शकतो. पण, जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यापासून आजपर्यंत ते आहेत तरी कुठे? असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला. संजय राऊत पत्रकारांशी बोलत होते. जगदीप धनखड यांच्या प्रकृतीची काय स्थिती आहे?



## फडणवीसांच्या शिलेदाराच्या हाती धनुष्यबाण!

### माजी आमदार शिरीष चौधरी शिंदेसेनेच्या वाटेवर?

**अमळनेर । बाबुलाल पाटील ।** महायुती राज्यात सत्तेवर असली तरी पक्षांतर्गत कुरघोडी सुरुच असतात. मुंबईपासून सुरु झालेली ही कुरघोडी आता अमळनेरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.



येथील माजी आमदार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी जवळीक असलेले शिरीष हिरालाल चौधरी हे लवकरच शिंदे सेनेत प्रवेश करणार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात येत आहे. चौधरी २०२४ पर्यंत भाजपात होते. परंतु त्यांनी विधानसभा निवडणूक अपक्ष लढविल्याने त्यांना अधिकृतपणे पक्षातून निलंबित केले होते. परंतु त्यांचे भाजपा नेत्यांशी व विशेषता देवेंद्र फडणवीसांशी असलेले जिव्हाळ्याचे संबध असताना आगामी नगर पालिका निवहणुका लक्षात घेता चौधरी शिंदेंचा धनुष्यबाण हाती घेण्याच्या तयारीत आहेत. माजी आमदार शिरीष हिरालाल चौधरी हे अमळनेर विधान सभेत सन २०१४ साली माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील, आमदार अनिल अनिल भाईदास पाटील यांना पराभूत करीत अपक्ष निवडून येत सत्तेत सहभागी झाले होते. यानंतर त्यांनी मागील पंच वार्षिक व आताच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या विरोधात उमेदवारी केली होती. यावेळी त्यांनी आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या विरोधात अपक्ष उमेदवारी करीत विधानसभा मतदार संघात ७६००० मते मिळवली होती. सध्यस्थितीत पुढे असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या व नगरपालिका निवडणुका असल्याने माजी आमदार शिरीष चौधरी यांचे कार्यकर्ते यांचीही तयारी सुरु असून पुढील काळात शिंदे शिवसेना गटाकडून उमेदवारी करता येईल असेही बोलले जात आहे?

माजी आमदार शिरीष हिरालाल चौधरी हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून पंधरा आगस्ट पूर्वी किंवा नंतर एकनाथ शिंदे शिवसेना गटात लवकरच प्रवेश होण्याचे खात्रीशीर वृत्त आहे. यासंदर्भात शिरीष चौधरी यांच्याशी संपर्क साधला असता शिंदेसेनेत प्रवेश निश्चित असून फक्त तारीख ठरायची बाकी आहे, असे त्यांनी 'देशदूत'शी बोलतांना सांगितले. परिणामी तालुक्याच्या राजकारणाला पुढील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीत वेगळे वळण मिळणार असल्याचेही बोलले जात आहे.

## वाड्रांविरोधात ईडीचा मोठा खुलासा

**नवी दिल्ली ।** गुरुग्राममधील एका जमीन व्यवहारात मोठा गैरव्यवहार झाल्याचे ईडी चौकशीत समोर आले आहे. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांचे पती आणि उद्योगपती रॉबर्ट वाड्रा यांना या व्यवहारातून ५८ कोटी मिळाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. वाड्रा आणि इतर आरोपींविरोधात ईडीने आरोपपत्र दाखल केले आहे. यात त्यांना ५८ कोटींची रक्कम मिळाल्याचं सांगण्यात आलं आहे. यापैकी ५३ कोटी रुपये स्काय लाईट हॉस्पिटॅलिटी आणि ५ कोटी ब्लू ब्रीझ ट्रेडिंगद्वारे मिळाल्याचं सांगण्यात येत आहे. रॉबर्ट वाड्रा यांची चौकशी करण्यात आली होती. मात्र त्यांनी या प्रकरणात मृत पावलेल्या तीन जणांवर बोट दाखवलं आहे. या प्रकरणात ईडीने १५ एप्रिल आणि १६ एप्रिल २०२५ रोजी चौकशी केली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वाड्रा यांनी प्रश्नांची उत्तरं थेट देणं टाळलं. इतकंच काय तर एचएल पहवा, राजेश खुराणा आणि महेश नागर या तीन मृतांवर जबाबदारी झटकून टाकली. हे तीन लोकं त्यांच्यासाठी काम करायचे, असे वाड्रा यांनी सांगितले.

